16/2016

2016-17 ST

The Berar General Education Society's

**SITABAI ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, CIVIL LINES, AKOLA (M.S.)**

(Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati.)

**ONE DAY NATIONAL CONFERENCE**
**On**


# भारतीय महिला : काल, आज आणि उद्या

## (आंतरविद्याशाखीय)

२४ डिसेंबर २०१६

330

## मराठी भाग - ४




Scanned by TapScanner

 ISBN : 978-93-83587-68-1

# मराठी अनुक्रमाणिका भाग - ४



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | स्त्री सबलीकरण वास्तव आणि सद्य:स्थिती<br>**डॉ. प्रतिभा अहिरे**<br>**वनमाला डोंगरे** | १-४ |
| २ | सण-उत्सवातील ओवी गीतातून व्यक्त होणारी स्त्री<br>**जया रमाकांत शिंदे** | ५-८ |
| ३ | स्वंयसहाय्यता गटाद्वारे महिलांचे सक्षमीकरण - एक दृष्टिक्षेप<br>**सुनंदा शरदराव पगार** | ९-१२ |
| ४ | महिला सक्षमीकरणात राज्य महिला आयोगाची भूमिका<br>**प्रा. डॉ. जोंधळे इश्वर नारायण** | १३-१५ |
| ५ | महिला सक्षमीकरणात पुरूषांची भूमिका<br>**प्रा. व्हि. एम. घुबळे** | १६-२० |
| ६ | दलित स्त्रीयांच्या आत्मलेखनातून दलित जागृतीचे चित्रण<br>**प्रा. डॉ. वैशाली बाबुराव कोटंबे** | २१-२२ |
| ७ | महिला सबलीकरण - कायदा<br>**वैशाली य. वानखेडे**<br>**डॉ. उज्ज्वला पी. भडंगे** | २३-२६ |
| ८ | स्त्री गीताद्वारे ग्रामीण संस्कृतीतील स्त्रीचे महत्व<br>**प्रा. वंदना मधुकरराव देशमुख** | २७-३१ |
| ९ | भारतीय समाजात स्त्रियांचे सामाजिक स्थान व प्रश्न<br>**प्रा.विक्रम उखर्डा मोरे** | ३२-३४ |
| १० | महिलांच्या समस्या आणि सबलीकरणाची भावना<br>**बनकर अलका शंकरराव** | ३५-३७ |
| ११ | १९७५ नंतरच्या मराठी वैचारिक साहित्यातील स्त्रियांच्या योगदानाचे अलक्षित संदर्भ<br>**प्रा. भगवान पांडुरंग फाळके** | ३८-४१ |
| १२ | जागृत स्त्री-मनाचा हुंकार : स्त्रीवादी साहित्य<br>**प्रा. डॉ. भास्कर पाटील** | ४२-४५ |
| १३ | प्रशांत दळवी लिखित 'चारचौघी' नाटकातील स्त्री-व्यक्तिरेखा<br>**डॉ. भूमिका गो. वानखडे** | ४६-४८ |
| १४ | महिला सशक्तीकरण आणि सामाजिक स्थिती<br>**गरड रेश्मा वाल्मिकराव** | ४९-५१ |
| १५ | स्त्रीवादी चळवळ आणि स्त्रीयांची सामाजिक स्थिती<br>**चाटसे गौतम नाशिकेत** | ५२-५४ |





Scanned by TapScanner

# मराठी अनुक्रमाणिका भाग - ४



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ३१ | महिला सशक्तीकरण आणि घटनात्मक तरतूदी<br>**वैशाली गिरीधारी बनसोडे** | १०९-१११ |
| ३२ | ग्रामीण कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा<br>**प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे** | ११२-११५ |
| ३३ | भारतातील मध्ययुगीन काळातील स्त्रियांचा दर्जा<br>**प्रा. डॉ. घाडगे डी. के.**<br>**ज्योती प्रकाश गावंडे** | ११६-११८ |
| ३४ | महिला सक्षमीकरणातील सामाजिक समस्यांचे अध्ययन<br>**प्रा. अमरिष एस. गावंडे** | ११९-१२१ |
| ३५ | महिलांचे सामाजिक स्थान आणि सक्षमीकरण<br>**डॉ. आनंदा भिकुजी काळे** | १२२-१२५ |
| ३६ | महाराष्ट्रराज्य महिला आयोग :विकासात्मक दृष्टीकोण<br>**श्रीमती. शेख जहारा अब्दुल रहिम** | १२६-१२७ |
| ३७ | भारतातील स्त्रियांचा दर्जा<br>**प्रा. डॉ. दयानंद उत्तमराव राउत** | १२८-१३० |
| ३८ | भारतीय समाजसुधारणा चळवळीत डॉ. ॲनी बेझंट यांचे योगदान<br>**दिलीप दामू कुमरे** | १३१-१३३ |
| ३९ | कारंजा (लाड) तालुक्यातील विवाहोत्युक वधू कडून केल्या जाणाऱ्या अपेक्षांमधून ध्वमीत होणाऱ्या स्त्रियांच्या दर्जाचे अध्ययन<br>**सुयोधन देशमुख** | १३४-१३५ |
| ४० | बीड जिल्ह्यातील डोंगरी भागातील महिलांचा दर्जा<br>**श्रीमती शांता एन. जाधवर** | १३६-१३८ |
| ४१ | असंघटीत क्षेत्रातील महिला कामगारांच्या समस्यांचे अध्ययन<br>**डॉ. संतोष तु. कुटे** | १३९-१४२ |
| ४२ | आर्थिक विकासात महिलांचे योगदान<br>**डॉ. प्रा. संगीता धुंदले** | १४३-१४५ |
| ४३ | आधुनिक काळात मराठी साहित्यिक क्षेत्रात स्त्रीयांचे योगदान<br>**प्रा. रूपाली प्रशिल पाटील** | १४६-१५० |





Scanned by TapScanner

 ISBN : 978-93-83587-68-1

# ४१ असंघटीत क्षेत्रातील महिला कामगारांच्या समस्यांचे अध्ययन

डॉ. संतोष तु. कुटे
कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर.

## प्रस्तावना

भारतीय समाजात मुलाला वंशाचा दीवा म्हटले जाते परंतु मुलगी अशी पनंती आहे जी सासर व माहेर अशी दोन्ही कुळे उजळवीते. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्री पुरूषाच्या बरोबरीने वेळप्रसंगी पुरूषापेक्षाही जास्त यशस्वीपणे काम करत आहे. आज असे एकही क्षेत्र नाही ज्यात स्त्रीया काम करत नाही. प्रत्येक गुणवत्ता यादीत मुलांच्या तुलनेत मुलींची संख्याच जास्त पाहायला मिळत आहे. भारतामध्ये स्त्रीला वेगवेगळया रूपामध्ये पुजले जाते. स्त्रीला देवीस्वरूप मानले जाते. गृहीनीला गृहलक्ष्मी म्हटल्या जाते. वैज्ञीक काळापासुनच स्त्रीला महत्वाचे स्थान आहे. भारतीय इतिहात देखील मा. जीजाऊ, झाशीची राणी लक्ष्मी बाई इ. शुर स्त्रिया होऊन गेल्या पुर्वीपासुन स्त्रीयांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. बऱ्याच आदीवासीमध्ये अजुनही मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात आहे नावाच्या समोर आईचे नाव लावले जाते. अशी भारतीय संस्कृती संमवृद्ध आहे.

नंतरच्या काळात काही समाज कटकानी धर्माच्या नावावर स्त्रीयांचा छळच चालू केला स्त्रियांना शिक्षणापासुन वंचीत ठेवले बालविवाह, सती प्रथा, केशवपन इ. अनिश्ठ अमानवि प्राथांनी स्त्रियांची प्रगती कुंठीत करण्याचा प्रयत्न केला परंतु अनेक भारतीय समाजसुधारकांनी व ज्योतीबा व सावित्री बाई फुले यांनी स्त्रीला शिक्षणाचा अधिकार मिळवुन दीला व समाजात तीला सन्माने जगन्याची संधी उपलब्ध करून दीली . आज यशाच्या आकाशात ती शिक्षणांचे पंख घेऊन उंच भरारी घेत आहे.

**जिच्या हाती पाळण्याच्याची दोरी ती जगाला उध्दारी**

अशा शब्दात म. गांधीनी स्त्री चा गौरव केला जातो

भारतीय अर्थव्यवस्था ही कृशी प्रधान अर्थव्यवस्था आहे. कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा माणला जातो. त्या कृशीचा भोधच मुळात स्त्रीयांनी लावला. असा उल्लेख आहे. बी जमीनीवर पडले की ते रूजते व त्याचे यपांतर रोपात होउन त्या पासुन धान्य मिळवता येते. हे प्रथम सित्रयांचया लक्षात आले. व त्यानीच शेतीचा शोध लावला. आजही कृषी श्रमीकामध्ये स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. भारतीय समाजव्यवस्थेत घर संभाळणे हेच स्त्रियांचे प्रमुख कर्तव्य मानले जाते. समाजातील अगदी वरचा स्तर बहुतेक स्त्रिया आर्थिक अडचण असली तरच काम शोधण्यासाठी बाहेर पडत होत्या. व्यवसायासाठी शिक्षण या विचाराने मुळात स्त्री शिक्षणाचा आरंभच झाला नाही. इंग्रजी शिक्षण घेउन बाहेर पडणाऱ्या पुरूषानाच मुळी वाटायला लागले की, आमच्या स्त्रियांनी शिक्षण घ्यावे, मागासलेले राहू नये. या त्यांच्या विचारांना आगरकर, फुले, कर्वे, राममोहन रॉय त्यांनी मूर्त स्वरूप दिले. स्त्री शिक्षणाची एकनविन पंरपरा रूजायला लागली, पण शिक्षणाची मजल फार पुढे जात नसे कारण विवाह झाला की शिक्षण संपत असे.

त्याच काळात खरोखर बुध्दीमान स्त्रियांचा एक वर्ग तयार होवू लागला. या स्त्रिया शिक्षण, वैद्यकीय इत्यादी क्षेत्रातील उच्च पदे भूशवू लागल्या. नवीन विचार मांडणाऱ्या लेखिकाही निर्माण झाल्या अशा स्त्रियांचे समाजात खूप कौतुक व्हायचे विशेष बुध्दीमान स्त्रीयांना.

330



Scanned by TapScanner

 ISBN : 978-93-83587-68-1

दुसऱ्या महायुध्दानंतर मात्र ही थोडी परिस्थिती बदलली या महायुध्दानंतर संपूर्ण जगाची आर्थिक घडी अशी काही विस्कटून गेली की स्त्रिला चूलमूल हे कार्यक्षेत्र सोडून अर्थाजर्नासाठी बाहेर पडावे लागले. स्त्री अर्थाजर्नासाठी बाहेर पडली त्यामुळे तिचे समाजातील स्थान प्रतिष्ठीत झाले. स्त्रीयाचे जिवनमान वाढले. व्यक्तीमत्व फुलू लागले. आर्थिक स्थैर्य आले आणि हे सारे शिक्षण व नोकरी मुळे झाले. आजची स्त्री आपल्या पायावर उभं राहीली.

स्त्री अर्थाजर्नासाठी बाहेर पडली त्यामुळे तिचे समाजीतील स्थान प्रतिष्ठीत झाले. तळागाळातील स्त्रिया ज्या पध्दतीने अर्थार्जन करतात त्याचा औपचारीक शिक्षणाशी सबध नाही. उलट निरक्षर असण्याचा सभव जास्त. त्याचे शोषण होवू नये म्हणून सघटणा बाधणे, समान वेतनाचा नियम करणे, दारूबदी, कुटुब नियोजनच्या द्वारे त्याचे जीवन सुखकर करणे, इ. गोष्टि समाजाला व शासनाला करता येतील. त्याना प्रशिक्षण देवून अधिक कौशल्याचे काम करण्याची त्यांना संधी प्रदान करता येईल अशा प्रकारे शिक्षण व रोजगाराने सपन्न झालेली स्त्री भारतीय जीवनात राष्ट्रिय, सामाजीक, राजकीय व कौटुबिक उत्थान घडवून आणेल.

परंतु आजही काही ठीकानी स्त्रीया अनेक निवडणुका लढवतात उच्च पदस्थ होतात पण प्रत्यक्षात त्याचे सर्व कार्य त्यांच्या घरची पुरूष मंडळी किंवा तीचा पतीच पाहतो. स्त्रीयांना स्वतंत्र निर्णय घेण्याचा अधिकार कमी आहे. विकासाचे फायदे समाजातील सर्व स्तराच्या लोकाना सारखे मिळत नाही. सामाजिक व आर्थिक दृष्टया उच्चस्तरीय लोकंना विकासाचे फायदे अधिक तर निम्न स्तरीय लोकांना त्यांचे फायदे कमी मिळतात. यामुळे विकासाच्या प्रक्रियेत विषमतेची दरी वाढत जाते. सामाजीक, आर्थिक, शैक्षणिक, या सर्वच क्षेत्रात स्त्रिया मागे असल्यामुळे विकासाच्या योजनांचा फायदा घेण्यासाठी त्यांची क्षमता मर्यादीत असते. त्यामुळे विकासाच्या मुख्य धारेत त्या सामावून घेतल्या जात नाही.

**काम करणाऱ्या स्त्रीयांचे क्षेत्र निहाय प्रमाण**

| वर्ष | प्राथमिक क्षेत्र | निर्माणक क्षेत्र | सेवा क्षेत्र |
|---|---|---|---|
| 1971 : स्त्री पुरूष (एकुण) | 72.26 | 9.46 | 10.12 |
| स्त्रिया | 80.10 | 10.5 | 9.4 |
| 1981 : स्त्री पुरूष (एकुण) | 69.33 | 11.30 | 11.37 |
| स्त्रिया | 81.13 | 9.30 | 9.57 |
| 1991 : स्त्री पुरूष (एकुण) | 68.20 | 13.10 | 18.70 |
| स्त्रिया | 79.40 | 10.75 | 9.85 |
| 2001 : स्त्री पुरूष (एकुण) | 67.50 | 15.25 | 17.25 |
| स्त्रिया | 75.20 | 9.20 | 15.60 |
| 2011: स्त्री पुरूष (एकुण) | 68.20 | 11.21 | 18.90 |
| स्त्रिया | 82.20 | 9.10 | 16.36 |

श्रम अर्थशास्त्र डॉ. मृणालीनी फडनविस / डॉ. प्राची देशपाडे पान. 530 / Indian Economics serve

प्राथमिक क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांचे प्रमाण 1971 मध्ये 72.36 होते ते कमी होउन 1981 मध्ये 69.33 टक्के झाले. 2001–2011 सालामध्ये हयाचे प्रमाण कमी झाल्याचे दीसुन येते. उद्योग व सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांचे प्रमाण वाढले आहे. यांच्याविरूध्द स्त्रियांचे प्राथमिक क्षेत्रातील प्रमाण वाढ व निर्माणक क्षेत्रातील प्रमाणात घट झाली आहे. यावरून असे म्हणता येईल की विकासाच्या प्रकियेमुळे जे औद्योगिकरण झाले तसेच सेवा क्षेत्राचा विस्तार झाला त्यात स्त्रियांचा शिरकाव अजून फारसा कमी झालेला नाही.

330



Scanned by TapScanner

ISBN : 978-93-83587-68-1

### संघटीत व असंघटीत क्षेत्र

काम करणाऱ्या स्त्रियांपैकी 94 टक्के स्त्रिया असंघटीत क्षेत्रात तर फक्त 6 टक्के स्त्रिया संघटीत क्षेत्रतसेचात काम करतात. असंघटित क्षेत्रात मजुरीचे दर कमी, नोकरीची अनिश्चितता, अनियमितता तसेच वृद्धापकाळासाठी कुठलीही तरतूद नसते. याशिवाय काही विशिष्ट व्यवसाय असे आहेत ज्यात स्त्रियांचे केंद्रीकरण झाले आहे. 50 टक्के पेक्षा जास्त श्रमिकक या व्यवसायात स्त्रियाच आहेत. अशा व्यवसायात स्त्रियांना मिळणार वेतन कमी असते.

समान काम समान वेतन हा कायदा होउनही स्त्रियांना पुरूषांच्या तुलनेत काही व्यवसायामध्ये बरेच कमी वेतन मिळते. शेती व उद्योग दोन्ही क्षेत्रात वेतनातील विषमता आढळते. स्त्रियांचा रोजगारीचा दर्जा अत्यंत खलावलेला आहे हे यावरून स्पष्ट होते.

### असंघटीत क्षेत्रातील महिलांची स्थिती

काही वर्षांपूर्वी असंघटित वर्गातील स्त्रियांचे काम मानले जात नव्हते दृ 1988 च्या श्रम शक्ती आयोगाच्या अहवालानुसार सर्वप्रथम हे जाणवले की, असंघटीत श्रम शक्तीमध्ये 9 कोटी महिला रोजगार कमवितात. पण त्यांच्या रोजगार आणि सामाजीक सुरक्षिततसाठी कोणतेही नियम व कायदे नाहीत. श्रमशक्ती आयोगाला असंघटीत क्षेत्रातील महिलांच्या रोजगारीबददल दोन गोष्टि अस्वस्थ करणाऱ्या आढळल्या, एक म्हणजे हया गरिब महिलांच्या प्रती सरकारी अधिकाऱ्यांची असंवेदनशीलता आणि दुसरी म्हणजे हया स्त्रीयांना समाजातील भूमिका समजने कठीणच होते. तसाच स्त्रीयांना समाजात दुय्यम स्थान असल्याने हया महिलाच्या पदरी काहीच पडत नाही. पुरुषांच्या तुलनेत स्त्री बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे.

आज परिस्थिती बरीच बदललेली आहे. आज हे मानले जाते की जर या कामकरी महिलांनी काम सोडून दिले तर देशाची अर्थव्यवस्था डळमळीत होउ शकते. सरकारी धोरणामध्ये काही बदल झालेला आहे., स्त्रियांसाठी शिक्षण–प्रशिक्षणाचे कार्यक्रम आयोजीत केले जातात. असे असले तरीही नीती–निर्माण कार्यक्रमात स्त्रियांचा सहभाग नसल्याने हे सर्व कार्यक्रम व योजना तितक्याशा प्रभावी ठरत नाहीत, अधिकाऱ्यांच्या वागणूकी स्त्रियाच्या प्रती बदललेल्या नाहीत त्यामंळे देशातील श्रमशक्तीमध्ये स्त्रिया आणि पुरूषांच्या तुलनेत खालावलेली आहे. बचत गटाअंर्तगत अनेक महिला बचत गटांनी प्रगती करून असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांना काही प्रमाणत का हाईना महिलांना एक दीलासा मीळाला असुन अनेक स्त्रिया त्याव्दारे आपला व आपल्या कुटुंबाचा विकास साध्य करित आहे.

### रोजगारीच्या समस्या

1) महिला प्रशिक्षित नसाल्यामुळे त्यांना रोजगार कमी मिळतो.
2) घरगुती उद्योगामध्ये स्त्रियांना फक्त मदती फक्त मदतीलाच घेतली जाते. त्यामुळे तीचे आर्थिक स्थान दुययम राहते.
3) स्त्रीयांची वेगळी अशी कोणतीच संघटना नाही.
4) विशेषत: शारीरिक काम करणाऱ्या कामकारी स्त्रियांच्या वेतनात भेदभव केला जातो.
5) कामकरी स्त्रियांना घरात व घराबाहेर दोन्ही ठिकाणी काम करावे लागते.
6) कामकरी स्त्रिया कामावर गेल्यावर त्यांच्या मुलांकडे लक्ष देण्यासाठी कुणीही तयार नसते.
7) काम करीत असतांना बऱ्याच स्त्रीयाचा शारीरीक शोषण होते.
8) भारतात आजही स्त्री ला आर्थिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र नाही.

Arts & Science Mahila Mahavidyalaya
Mehkar, Dist. Buldana



Scanned by TapScanner

 ISBN : 978-93-83587-68-1

स्त्री कामगारांच्या विकासासाठी उपाययोजना

1) राष्ट्राचा सामाजीक, आर्थिक व राजकीय विकास होण्यासाठी स्त्रियांना समानता मिळणे ही एक मूलभूत अणि आवश्यक अशी बाब आहे.
2) स्त्रीयाच्या श्रम सघटना निर्माण झाल्या पाहीजे
3) स्त्रीयांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मीळाला पाहीजे
4) स्त्री–पुरूष समाणता आणने आवश्यक आहे. पुरूषाने स्त्रीला घरकामात मतद करायना हवी
5) काम करण्याच्या ठीकाणी पाळणाघर हवे.
6) कुठल्याही प्रकारचे शोषन झाल्यास दोशीवर कडक कारवई झाल्यास दुसर कोणी अशा प्रकारचे कृत्य करण्यास हीम्मत करणार नाही.
7) समान कामाला समान वेतन हे धोरण लागू करून व्यवसायातर्गत प्रशिक्षणाची सोय केली जावी.
8) स्त्रीने संघटीत होउन आपल्या लिखाणातून, मागणीतून सर्वोच्च पदावर आसीन राज्यकर्त्यांपर्यंत असपली मते वारंवार पोहचवावीत

सरकारने स्त्रीयांच्या विकासाकरिता बऱ्याच प्रमाणात योजना आखल्या त्याचा फायदा काही प्रमाण त दीसुन येतो. त्यामुळे स्त्रीयांची आजची स्थिती नक्कीच सुधारली. स्त्रहयाना योग्य मार्गदर्शन व माहीती मिळाल्यास सरकारच्या विविध योजनांची माहीती मिळून त्याचा लाभ अनेक स्त्रीया घेवु शकतील. तसेच बचत गटांन मार्फत देखील अनेक स्त्रीयांना उद्योगाच्या नविन संधी उपलब्ध होतील सरकारच्या स्टार्टप इडीया योजनेचा फायदा ही घेवु शकतील. सरकार सोबतच अनेक स्वयसेवी संघटनांनी देखील यात पुढाकार घेणे आवश्यक आहे. त्यातुनच खऱ्या अर्थाने असंघटीत स्त्रीयांची स्थीती सुधारेल.

## संदर्भ सुची

1) श्रम अर्थशास्त्र डॉ. मृणालीनी फडनविस / डॉ. प्राची देशपांडे पान. 530.
2) भारतीय अर्थव्यवस्था दत्त सुदरम.
3) कृशी अर्थशास्त्र निता वाणी.
4) कृशी अर्थशास्त्र कविमंडन.
5) प्रतियोगीता दर्पन.
6) दै. लोकमत.

Co - Ordinator IQAC
Arts & Science Mahila Mahavidyalaya
Mehkar, Dist. Buldana



Scanned by TapScanner